ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII    Issue - I    Marathi Part - I    January - March - 2019

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | दलित कवितेची सद्यस्थिती<br>**प्रा. कातकडे केशव श्रीरंग**<br>**प्रा. गजलवार रमाकांत काळबाराव** | १-५ |
| २ | आदिवासी साहित्य : कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथा, वैचारिक लेखन<br>**वऱ्हाडे बापुराव भास्कर** | ६-८ |
| ३ | आदिम दु:खाची गाथा : रानआसवांचे तळे<br>**जया रमाकांत शिंदे** | ९-१२ |
| ४ | अण्णाभाऊ साठेंची कादंबरी एक चिंतन<br>**प्रा. डॉ. मेधा गोसावी** | १३-१५ |
| ५ | स्त्रीवादी साहित्य : कवितेच्या संदर्भात<br>**डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर** | १६-२१ |
| ६ | साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी - स्वरूप व वाटचाल<br>**डॉ. योगिता मारूती रांधवणे** | २२-२४ |
| ७ | समकालीन दलित कवितेची सद्य:स्थिती<br>**प्रा. डॉ. रमेश श्रीरंग औताडे** | २५-२९ |
| ८ | दलित चळवळीची शोकांतिका मांडणारे नाटक: बाई तुम्ही कुठे आहात !<br>**डॉ. संदिप बनसोडे**<br>**सुनिल सदाशिवराव कांबळे** | ३०-३३ |
| ९ | वंचित नवशिक्षीत पिढीचा आवाज : भटक्या विमुक्तांची आत्मकथने<br>**डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे** | ३४-३८ |
| १० | ग्रामीण कविता : सद्य:स्थिती<br>**प्रा. बोतिवाड नागेश रामलु** | ३९-४१ |
| ११ | भटक्या विमुक्तांच्या साहित्य चळवळीची सद्यस्थिती<br>**डॉ. सरला गोरे/ साबकारे** | ४२-४४ |
| १२ | ग्रामसंस्कृतीच्या परिवर्तनाच्या कथा : 'दाही दिशा'<br>**प्रा. बादलशहा डोमाजी चव्हाण** | ४५-४९ |


38

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ८. दलित चळवळीची शोकांतिका मांडणारे नाटक: भाई तुम्ही कुठे आहात !

**डॉ. संदिप बनसोडे**
मार्गदर्शक, मराठी विभाग, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई.
**सुनिल सदाशिवराव कांबळे**
नाट्यशास्त्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

मराठी नाट्य परंपरेचा उदय आणि अनुकूलतेचा कालखंड हा १८५५ ते १९५५ मानला जातो. विचारांचा प्रचार आणि प्रसार याचे महत्त्वपूर्ण माध्यम हे नाटक मानले जाते. सदरील कालखंडात अनेक सामाजिक नाटक मराठी रंगभूमीवर होऊन गेले. त्यातूनच अनेक नव्या रंगभूमीचा उदयही झाला. आपले विचार तसेच आपली मते, लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी नाटकाचा वापर होतांना दिसून आला. नाटकांद्वारे उद्बोधन आणि मनोरंजन हे होते. त्यामुळेच अनेक नाट्य चळवळी कालांतराने निर्माण झालेले दिसून आले. दलित नाट्य चळवळीचा उदय हा १९६० साली मराठवाड्यात झाला आहे. तसे पाहिले तर दलित रंगभूमी ही दलितांची सांस्कृतिक गरज भागविण्यासाठी निर्माण झाली आहे. दलित रंगभूमीद्वारे दलितांची संस्कृती, त्यांची कला, साहित्य तसेच विद्रोही चळवळ या बाबींना दलितांना सादर करता यावे. यासाठी दलित रंगभूमीचा उदय झाल्याचे दिसून येतो. या दलित रंगभूमीवर काम करणाऱ्या रंगकर्मींना 'दलित' यांना केंद्रस्थानी ठेऊन त्यांच्यावरील अन्यायाला सादर करायचे होते. दलित रंगभूमीवर सादर होणाऱ्या नाटकातील घटना आणि जीवनचित्र हे सर्व दलितांचे असते. दलित नाटकाचे वैशिष्ट्ये म्हणजे सामाजिक बांधिलकीचे दर्शन होय. त्यामुळे दलित नाटकातील सर्व सामाजिक समस्या आणि प्रश्न तसेच त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय यांच्यावर भाष्य करण्यात येते. त्यामुळेच दलित नाटकांद्वारे दलितांचे प्रबोधन व्हावे याच उद्देशाने दलित रंगभूमीची निर्मिती झाली आहे. त्यामुळे मराठी रंगभूमीप्रमाणे मनोरंजनापेक्षा दलित रंगभूमीने वैचारिकतेला जास्त महत्त्व दिले आहे.

दलितांना वेठीस धरणारे दलितांच्या भावनांचा बाजार मांडणारे दलितांना फसविणारे आणि दलितांवर अधिकार गाजविणारे अशा घटकांना धक्का देण्याचे कार्य दलित नाटकाद्वारे घडून येतांना दिसते. दलित रंगभूमी ही आक्रमक रंगभूमी, विद्रोही रंगभूमी मानली जाते. त्यामुळेच व्यावसायिक दलित रंगभूमीचा जास्त विकास न होता दलित नाटकांमध्ये दलितांच्या विकासासाठी आणि त्यांच्या समस्यांना वाच्यता फोडणारी प्रत्यक्ष अशी नाट्य चळवळ ही होऊन बसली आहे. या दलित रंगभूमीवर दलित व्यक्तींच्या भावना आणि त्यांच्या दुःखांचे आणि त्यांच्या रूढीवादी समाज विरोधातील आंदोलनाचे रूपांतर नाटकांमध्ये दिसून येते.

दलित नाटकांचा अभ्यास करतांना त्यांचे स्वरूप लक्षात घेतांना 'दलित' या शब्दाची परिभाषा, व्याप्ती आणि दलितांच्या जाणिवा यांचा विचार देखील करावा लागेल. डॉ. ईश्वर नंदपुरे हे आपल्या विचारात मांडतात की, दलित या विशेषणाचा उदय 'दल' या संस्कृत धातूपासून झाला आहे. तसेच 'दलित' या शब्दाचा अर्थ म्हणजे तुडविलेले असा होतो. हा शब्द समाजातील

तुडविलेल्या जात-वर्ण-वर्ग यांना उद्देशून म्हणतात. म्हणजेच सामाजिकदृष्ट्या मागासलेले जे अस्पृश्य आहेत, ज्यांना समाजातून बहिष्कृत करण्यात आलेले आहे अशा समाज घटकांना 'दलित' संबोधले जाते.[1]

दलित रंगभूमीचे बीज हे सर्वप्रथम मराठवाड्यात रूजले गेले. मराठवाडा हा मागासलेला भाग असल्यामुळे या ठिकाणी कमालीची विसंगती अशी समाजात दिसून येते. मराठवाड्याच्या रंगभूमीला तसं पाहिले तर कोणताही वारसा लाभलेला नव्हता. सण-उत्सवाच्या निमित्ताने तात्पुरते रंगमंच हे स्वातंत्र्यपूर्व काळात होते, जेथे लोककलेचे सादरीकरण होत होते. एकनाथी भारूड, गोंधळ, लळीत, सोंग, तमाशा, या स्वरूपाच्या लोककला सादर होत होत्या मराठवाड्यातील या उत्सवी स्वरूपात निर्माण झालेली रंगभूमीची परंपरा तशी पाहता शंभर वर्षांपेक्षा अधिक असल्याचे पुरावे सापडतात.[2]

स्वातंत्र्योत्तर काळात मराठवाड्यात शैक्षणिक संस्थांद्वारे नाट्यनिर्मिती होत गेली आणि मराठवाड्यातील नाट्यचळवळीला समृद्ध करण्याचे कार्य कॉलेज थिएटरमुळे घडल्याचे दिसून येते. याच महाविद्यालयीन रंगमंचाद्वारे दलित रंगभूमीची मुहूर्तमेढ मराठवाड्यातील रंगभूमीवर रोवली गेली. मिलिंद महाविद्यालयाच्या खुल्या रंगमंचावर नाटककार आणि मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य, म. भि. चिटणीस यांनी भारतरत्न बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित आणि युगानयुगे चालत आलेल्या दलितांवरील अत्याचारांवर आधारित नाटक 'युग यात्रा' या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला. या नाटकाच्या प्रयोगाला स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते, हा नाट्य प्रयोग म्हणजे आधुनिक दलित रंगभूमीवर इतिहास घडविणारे पहिले दलित नाट्य होय. यातूनच दलित नाट्य परिषदेची निर्मिती नागसेनवनात झाल्याचे दिसून येते आणि येथूनच मराठी रंगभूमीवर दलित रंगभूमीची सुरूवात झाली. त्यानंतर दलित रंगभूमीवर अनेक दलित नाटके ही निर्माण होत लागली. यातून दलित नाट्य लेखकांची पिढीपण निर्माण झाली. 'गाव नसलेलं गाव', 'आम्ही', 'अजाने घडलेची नाही', 'अश्मक', 'थांबा ! रामराज्य येतयं', 'आठवणीचे पक्षी', 'भगवान पर मुकदमा', 'मरणवराल', 'प्रतिबिंब', 'वाटा पळवाटा', 'स्मारक', 'स्वातंत्र्य कोणत्या गाढवीचं नाव' या दलित नाटकांची निर्मिती होत गेली. प्रा. दत्ता भगत, भगवान सव्वाई, प्रा. कुमार देशमुख, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रकाश त्रिभुवन, प्रा. महाजन, प्रा. रूस्तुम अचलखांब, प्रा. आर. के. क्षिरसागर, प्रा. अविनाश डोळस या दलित नाटककारांनी दलित रंगभूमीवर दलित नाट्य चळवळी उभी केली. यामुळे महाराष्ट्रातच नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावर आपले वेगळेपण सिद्ध करत मराठवाडा हे दलित रंगभूमीचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले.[3]

म्हणूनच, मला माझ्या शोध निबंधामध्ये दलित नाटकांची बदलत जाणाऱ्या स्थितीचे विवेचन' अभ्यासल्यावर असे लक्षात आले की, दलित रंगभूमीही कशी दलितांच्या विद्रोहाला आणि आक्रमक पद्धतीला प्रभावीपणे दलित नाटकांच्या माध्यमातून समाजापुढे मांडण्याचे कार्य करतांना आपल्यास दिसून येते. भूक आणि अस्पृश्यता अशा स्वरूपाच्या अन्यायाचे दर्शन हे दलित नाटकाद्वारेच समाजापुढे मांडण्यात आली. त्यामुळेच मराठी रंगभूमीवर काही वर्षे दलित रंगभूमीचे वेगळे स्थान होते. परिवर्तन आणि क्रांतीचा विचार नवीन नाटककार आपल्या नाटकातून समाजासमोर मांडतांना दिसून आले.[4] सध्या दलित रंगभूमी म्हणावी तितकी सक्रिय दिसून येत नाही. महाराष्ट्रात ऐंशीच्या दशकात दलित रंगभूमी ऐन भरात असतांना औरंगाबादमधील दलित नाटककारांनी आपल्या दलित नाटकाद्वारे समाजात परिवर्तनवादी विचार पसरविले. परंतु आता

आंबेडकरी जलशानंतर नवीन नाटकाचा अभाव दिसू लागला आहे. आणि याच दरम्यान दलितांच्या राजकीय द्वंद्व आणि दलित नेते, चळवळीचे कार्यकर्ते यांच्यातील भेदाभेद आणि घुसमट याचे चित्रण डॉ. ऋषिकेश कांबळे लिखित, 'भाई तुम्ही कुठे आहात !' या नाटकात केले आहे. भाई तुम्ही कुठे आहात! हे नाटक सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेवर परखड विचार मांडले आहेत. या नाटकाद्वारे दलित चळवळीमध्ये आता नवीन विचार यायला हवे, ही जाणिव करून दिली. आता दलित चळवळ ही दिवसेंदिवस कशी बोथट होत चालली आहे, आणि त्यामुळे नाटकांमध्ये याचे चित्रण केले गेले आहे. एकंदरीत दलित चळवळीतील चाललेला संघर्ष आणि द्वंद्व हे या दलित नाटकात मांडले आहे.

आज काळ बदलला आहे काळानुसार आज शिक्षणासह सामाजिकदृष्ट्या जरी समानता आली असली तरी देखील आजही दलित समाजाला जातीयता जाणवतेच. त्यामुळेच या दलित चळवळीच्या नाटकामध्ये विद्रोही लेखन झाल्याचे आपणास दिसून येते. या दलित नाटकाद्वारे समाज व्यवस्थेवर ताशेरे ओढले गेले आहे परंतु सद्य परिस्थितीतील दलित चळवळ ही आपआपसातल्या संघर्षाने आणि हेवेदाव्याने कशी बोथट होती आहे हे नाटकामधून दिसून येते. या नाटकाद्वारे दलित चळवळीतल्या प्रत्येक घटकातील चळवळीबद्दलची तळमळता तसेच उदासीनता याचे चित्रण लेखक डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी आपल्या 'भाई तुम्ही कुठे आहात !' या नाटकात केले आहे.

सदरील नाटक हे दलित नेता आणि त्याचे कार्यकर्ते यांच्यातील घुसमट, द्वंद्व आणि दलित चळवळ निस्तेज कशी होत चालली आहे याचे चित्रण या दलित नाटकात केले आहे. दलित नेते, 'भाई' आणि 'दलित चळवळीचा' कार्यकर्ता मिलिंद यांच्या भोवती हे नाटक घडतांना दिसून येते. सदरील नाटकामध्ये तीस ते पसतीस कलावंत भूमिका करतात. दलित चळवळीत लोकांची होत चाललेली तुटातुट आणि विभागत जाणारे नेतृत्व आणि त्यामुळे दलित चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे होणारे खच्चीकरण यांना नाटकात दर्शविले आहे. नाटकाच्या सुरुवातीला 'भाई' एका सभेत भाषण देत असतात त्यांचे भाषण झाल्यावर मिलिंद हा भाईंना भेटतो आणि भाईंनी चळवळीला कमकुवत कसे केले, त्यांच्या दुटप्पी धोरणामुळे दलित चळवळ कशी लयाला जात आहे याची जाणिव त्याने भाईला करून देतो. भाईंनी चळवळीला कमकुवत का केले, आणि आमच्यासारख्या चळवळीतील तरूण कार्यकर्त्यांची पिढी बर्बाद का केली याचा जाब मिलिंद भाईंना विचारतात. सदरील नाटकाद्वारे दलित चळवळीमधील होत चाललेली तफावत ही नाटककाराने दर्शविले आहे. चळवळीसाठी आणि बाबासाहेबांच्या विचारांसाठी झगडणारे नेते आणि कार्यकर्ते कसे पुर्वी कुणालाही न जुमानता स्वत:च्या लोकांच्या न्यायासाठी झगडायचे, लढा द्यायचे परंतु जसजसा काळ बदलत गेला, तसतसे दलित नेते व कार्यकर्ते हे अकार्यक्षम कसे होत गेले हे अनेक प्रसंगातून या नाटकात दर्शविले आहे.

दलितांचा नेता भाई हा बेदरकार आणि बेधडकपणे वागायचे आपल्या दलित कार्यकर्त्यांवर जर काही अडचण आली तर भाई त्यांना मदत करत असे. आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचार विरुद्ध पेटून उठणारा भाई आता किती थंड झालाय आणि त्याच्यामुळे चळवळीची कशी माती केली याची वेळोवेळी जाणीव ही मिलिंद संवादाद्वारे दर्शविले गेले आहे. पुर्वीचा भाई जो बिधास्त होता, निडर होता, चळवळीसाठी आणि आपल्या कार्यकर्त्यांसाठी झगडणारा होता तोच भाई हतबल होऊन चळवळीची होणारी दुर्दशा पाहतांना मिलिंदचा संताप होतांना दिसून येतो. उच्च वर्णीय नेत्यांद्वारे दलित नेत्यांना आमिषे



40

दाखवून कसे चळवळीला अकार्यक्षम करण्याचे काम होत आहे. त्यासाठी युक्तीचा वापर ते कसे करतात याचे चित्रण हे या नाटकात केले गेले आहेत. दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरुद्ध बंड हे फक्त दलितच कार्यकर्ते करत नव्हते, तर सवर्णांमधीलही काही लोक हे दलित चळवळीमध्ये काम करत होते. त्यांना खरच दलित समाजाच्या हिताची काळजी वाटत होती असे हे कार्यकर्ते चळवळीला मदत करत असल्याचे नाटकाद्वारे दर्शविले आहे. परंतु दलित नेत्यांमध्ये एकी नसल्यामुळे दलित चळवळीत फूट पडते आणि त्यामुळे दलित चळवळीतील कार्यकर्ते हे संभ्रमात राहून दलित चळवळीचे वाटोळे होतांना पाहतात हे चित्रण नाटकात केले गेले आहे. नाटकाची पार्श्वभूमी बघता प्रसंगानुसार नेत्यांची विफलता ही दिसून येते. नाटकातील काही प्रसंगात दलित कार्यकर्ते हतबल आणि नैराश्याने ग्रासलेले नाटकाच्या कार्यकर्ते हे दलित चळवळीला उभारी आणण्याचे कार्य आता नविन पिढीने करावे हे विचार नाटकाच्या शेवटी नमूद करतात.

सदरील शोध निबंधाद्वारे संशोधक विद्यार्थ्याला असे नमूद करायचे आहे की, डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी या नाटकाद्वारे दलित चळवळीची शोकांतिका प्रेक्षकांसमोर मांडली आहे. दलित चळवळ ही कशी शिथिल होत चालली आहे तसेच चळवळीचे कार्यकर्ते, नेते अकार्यक्षम आणि आपआपसातील मतभेदांमुळे चळवळीच्या ऱ्हासाला कारणीभूत होत चालले आहे. दलित चळवळ ही आता द्विधा मनस्थितीमध्ये असल्याचे दिसून येते. अशा चळवळीतील कार्यकर्ते हतबल कशी आहेत हे नाटकात दाखविले आहे. सद्य स्थितीतील दलित समाजामध्ये पुसट होत चाललेली सामाजिक भावनेने दलित चळवळ आणि त्याच्याशी निगडीत लोकांचे कसे नुकसान होत आहे हे या नाटकात मांडले गेले आहे. डॉ. ऋषिकेश कांबळे लिखीत, 'भाई तुम्ही कुठे आहात !' हे नाटक दलित चळवळीत काम करणाऱ्या प्रत्येक घटकाला खरोखरच अंतर्मुख करायला लावणारे आणि दलित चळवळीतील शोकांतिका मांडणारे नाटक आहे.

**संदर्भ**

१) नवपुरे इश्वर, दलित नाटक आणि रंगभूमी, विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद द्वितीय आवृत्ती - २०१८.

२) देशपांडे द. ग., नाट्यवेडा मराठवाडा, मल्हार प्रकाशन, जालना - १९९२.

३) धांडे चंद्रकांत, नाट्यमंथन, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद प्रथम आवृत्ती - ४ मे २००३.

४) कांबळे मिलिंद, मराठवाडा : सृजन आणि साहित्य, इसाक प्रकाशन, नांदेड प्रथम आवृत्ती - २५ मार्च २०११.

५) दलित रंगभूमीवर पुन्हा झुंजु मुंजु, https//maharashtratimes.com/ entertainment.

६) कांबळे ऋषिकेश, 'भाई तुम्ही कुठे आहात !', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद - ९ जुलै २०१४.